

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्ग पूर्ण होण्यासाठी आणखी विलंब!

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 17/06/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 133 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# भावी पिढी घडविण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे - अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : शाळा प्रवेशोत्सव २०२५ कार्यक्रमाअंतर्गत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी शाळा सुरु होण्याच्या पहिल्याच दिवशी दौंड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा आलेगाव पुनर्वसन या शाळेत विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत केले. यावेळी गट विकास अधिकारी महेश ढोके, गटशिक्षणाधिकारी संजय महाजन, विस्तार अधिकारी शरीफा तांबोळी, केंद्र प्रमुख आशा धाडगे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वीरधवल (बाबा) जगदाळे आदी उपस्थित होते. शालेय जीवनातील आठवणीला उजाळा मिळाला असे सांगून पवार म्हणाले, भावी पिढी घडविण्यासाठी विद्यार्थ्यांना आधुनिक, दर्जेदार शिक्षण उपलब्ध



करुन देण्यासोबतच सर्व शाळांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे ही राज्य शासनाची नैतिक जबाबदारी आहे. त्यादृष्टीने विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, बूट उपलब्ध करुन देण्यात येत आहेत, याकरिता राज्य शासन शिक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च करीत आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण घेतांना अडीअडचणी येणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात येत आहे. शिक्षकानेही विद्यार्थ्यांना दर्जेदार ज्ञान देण्याच्यादृष्टीने अध्यापन केले केले पाहिजे.

राज्य शासनाने १० कोटी वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एका वृक्षाची लागवड करून त्यांचे संगोपन केले पाहिजे. यामुळे लहानपणापासून विद्यार्थ्यांवर पर्यावरण विषयक संस्कार होण्यास मदत होईल या माध्यमातून पर्यावरणाचा समतोल साधण्याचा प्रयत्न आहे, असेही श्री. पवार म्हणाले.

पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तके आणि गणवेशाचे वाटप करण्यात आले. यावेळी आलेगावचे पुनर्वसनचे सरपंच नवनाथ झुंबर कदम, मुख्याध्यापिका अनिता खताळ, ग्रामसेवक अर्चना भागवत, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संभाजी कुतवळ आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनो देश व राज्याचा नावलौकीक वाढवा – उपमुख्यमंत्री शिंदे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : शाळा ही संस्कार घडविणारे मंदिर असून या मंदिरात शिक्षक हे देशाची उज्वल भावी पिढी घडवित असतात. विद्यार्थ्यांनीही कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती यासह सर्व विषयांमध्ये संपूर्ण ज्ञानक्षम होण्यासाठी शिक्षकांना प्रतिसाद द्यावा. भरपूर अभ्यास करुन मोठे व्हावे व देशाचा तसेच राज्याचा नावलौकीक वाढावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.



सातारा तालुक्यातील कोडोली जिल्हा परिषदेच्या प्राथमिक केंद्र शाळेत ‘शाळा प्रवेशोत्सव २०२५-२६’ च्या कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत ‘माझी शाळा आदर्श शाळा’ उपक्रमांतर्गत उभारण्यातत आलेल्या शाळेचेही उद्घाटन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केले. या प्रसंगी आमदार महेश शिंदे, आमदार मनोज घोरपडे, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शबनम मुजावर आदी उपस्थित होते.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी विविध उपक्रम राबवित आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत आहे. या शाळांमधील विद्यार्थी उच्च पदावर काम करत आहेत. माजी राष्ट्रपती दिवंगत ए.पी.जी. अब्दुल कलाम, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यानींही शासकीय शाळांमध्ये शिक्षण घेतलेले आहे.या कार्यक्रमास शिक्षक, पालक विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंद्रायणी नगर मध्ये विद्यार्थ्यांचा गुणगौरव

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शहरात दिनांक 15 जून 2025 रोजी रविवार सायंकाळी 5 वाजता कै. भिवाजी सहाणे सभागृह गणेश मंदिर इंद्रायणी नगर भोसरी येथे इंद्रायणी युवा प्रतिष्ठान व तुषार सहाणे युवा मंच यांच्या वतीने प्रभाग क्रमांक 8 मधील 10 वी व 12 वी मध्ये 85 % वरील गुणांनी उतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व करियर मार्गदर्शन सोहळ्याला विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शन म्हणून प्रा. संदीप पवार ( डायरेक्टर मोशन अकॅडमी, मोशी व युनिक अकॅडमी सांगवी पुणे) यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील करियर संधि आणि प्रवेश प्रक्रिया यावर मार्गदर्शन केले तर प्रा. जितेंद्र पवन (आय. आय. टी. मुंबई) यांनी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय क्षेत्रातील करियर संधि



आणि प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन केले तसेच प्रा. डॉ. कैलास सोनवणे ( स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन) मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रमुख मान्यवर म्हणून रूपेश पारुळेकर, सदाशिव ( बापू) आगळे, प्रकाश सहाणे, रघुनाथ हांडे, विठ्ठल (नाना) वाळूंज, भास्कर दातीर, अजिंक्य पोटे, विनोद जाधव, विश्वनाथ टेमगिरे, सुरज झांजूर्णे, स्वप्नील ओव्हाळ उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. प्रा. संदीप पवार सरांनी विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्राबाबत मार्गदर्शन केले व प्रा. जितेंद्र पवन सरांनी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय क्षेत्राबाबत मार्गदर्शन केले.

तसेच प्रा. डॉ. कैलास सोनवणे सरांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा चे मार्गदर्शन केले प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांच्या उज्वल भविष्यासाठी प्रोत्साहन दिले. परिश्रमाचे महत्व पटवून दिले गेले आणि समाजसेवा व शिक्षण यांचा समन्वय कसा साधावा हे सांगितले गेले.


विद्यार्थ्यांना करियरच्या विविध संधिबद्दल मार्गदर्शन मिळाले. त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करियर करण्याचे महत्व उलगडून सांगण्यात आले. पोलिस प्रशासन उद्योग आणि इतर क्षेत्रात कामगिरी केलेल्या अनुभवांचे दाखले देऊन विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली गेली.

प्रभागतील इयत्ता 10 वी मधून प्रथम क्रमांक वेदांत प्रकाश खैरणार व संची मंगेश घोलप द्वितीय क्रमांकावर सार्थक आदिनाथ नामदे व प्राजक्ता पांडुरंग देशमुख तृतीय क्रमांकावर स्वरा सचिन रासकर, उदयसिंह फडतरे व गौरी हणमंत पवार आणि 12 वी मधून प्रथम क्रमांक कौशल अशोक टोपे, द्वितीय क्रमांकावर वैभव काळे व सुमन मोनदल तृतीय क्रमांकावर रेचल वैभव लकारे त्याचा बरोबर एकूण 290 गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अत्यंत प्रभावीपणे करण्यात आले. मान्यवरांनी आपल्या अनुभवांच्या कथा विद्यार्थ्यांसामोर मांडल्या व प्रोत्साहित केले.

# पुण्यात तरुणाच्या डोक्यात दगड घालून खून

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वैमनस्यातून तरुणाच्या डोक्यात दगड घालून खून करण्यात आल्याची घटना आंबेगाव मधील जांभूळवाडी तलावाच्या बांधावर घडली. याप्रकरणी आंबेगावपोलिसांनी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. रोहित नामदेव ढमाळ (रा. योगमुद्रा बिल्डींग, भूमकर वस्ती, नऱ्हे, सिंहगड रोड) असे खून झालेल्याचे नाव आहे.याप्रकरणी सूरज गणेश सूर्यवंशी (रा. गणेश पेठ) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत




रोहितचा मित्र दीपक सुखदेव बंडगर (२१, रा. प्रतीक हाईट्स, पारी कंपनीजवळ, नऱ्हे, सिंहगड रस्ता) याने आंबेगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सूरज आणि रोहित हे मित्र आहेत. त्यांच्यात काही कारणावरून वाद झाला होता शनिवारी (दि. १४) रात्री साडेदहाच्या सुमारास आंबेगाव परिसरात जांभूळवाडी तलाव परिसरात सूरज, रोहित यांच्यात वाद झाला. वादातून सूरजने रोहितच्या डोक्यात दगड घातला. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या रोहितला रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 17/06/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# विद्यार्थी गुणगौरव समारंभ व करिअर मार्गदर्शन शिबीर उत्साहात संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : आरंभ सोशल फाउंडेशन आयोजित विद्यार्थी गुणगौरव समारंभ व करिअर मार्गदर्शन शिबीर समारंभ काल रविवार दि.१५ जून २०२५ रोजी आचार्य अत्रे रंगमंदिर, संत तुकाराम नगर, पिंपरी येथे उत्साहात पार पडला. पिंपरी चिंचवड शहरातील चारशेहून अधिक दहावी, बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. शहराचे माजी उपमहापौर तुषार हिंगे, आरंभ फाऊंडेशनच्या संचालिका सौ सोनाली तुषार हिंगे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. टॅब, स्मार्ट वॉच, बॅग आणि प्रशस्तिपत्रक असे बक्षिसांचे स्वरूप होते.**




या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून युवा पत्रकार व मित्र सौमित्र पोटे यांनी मार्गदर्शन केले. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी सदस्य सदाशिव खाडे, भाजपा युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, मंडल अध्यक्ष जयदीप खापरे, आयआयबी शिक्षण संस्थेचे ॲड महेश लोहारे, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते रामदास अण्णा लुक्कर, आदी मान्यवर उपस्थित होते. निवेदक अक्षय शुभांगी रविंद्र मोरे यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. यावेळी सौमित्र पोटे यांनी अगदी सहज सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी आपल्या आयुष्यातील अनुभव सांगितला, कि कशा प्रकारे त्यांना दहावीला कमी गुण होते. तरीही वडिलांच्या आग्रहास्तव सायन्सला ऍडमिशन घेतलं. मग १२ वी परीक्षेत नापास झालो, आणि मग आर्ट्सला ऍडमिशन घेतलं. आर्ट्सला कॉलेजमध्ये अनेक व्यसनी मित्र सोबत होते. पण मी ठरवलं होत कि आपण हे करायचं नाही. चांगल्या विचारसरणीची माणसं आपल्या आजूबाजूला असली पाहिजेत. तुम्हाला तुमच्या गोष्टी ठरवायच्या आहेत असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. हळूहळू मी नाटकात काम करायला लागलो. माझी आवड जोपासली. नाटकाची आवड जोपासतच टीवायला विद्यापीठातून पाचवा आलो, कारण मी माझ्या आवडीचा क्षेत्र निवडलं होतं . पुढे जाऊन पत्रकारितेचं शिक्षण घेतलं. त्यातही मी जीव आतून सगळं शिकलो. त्यामुळे त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मैत्रीचा सल्ला दिला कि आपल्याला जे आवडेल तेच करा. गुण कमी जास्त झाले तरी नाउमेद होऊ नका. सौमित्र पुढे म्हणाले कि, प्रतिकूल परिस्थितिशी झगडा देऊन तुम्ही तुमच्या हिमतीवर हे गुण मिळवले. तुमच्या या इच्छेला, तुमच्या या उर्जेला तुषार भाऊंच्या माध्यमातून टर्बो इंजिन लागलं आहे. म्हणूनच तुमचा गुणगौरव होत असल्याचे त्यांनी म्हटले. तसेच त्यांनी आरंभ सोशल फाउंडेशनच्या या उपक्रमाचे आणि त्याचे आयोजन करणारे तुषार हिंगे आणि सोनाली हिंगे यांचे विशेष कौतुक केले. शत्रुघ्न काटे यांनी देखील यावेळी संबोधित करताना प्रथम तुषार हिंगे यांनी त्यांच्या आईच्या स्मरणार्थ वैकुंठ रथ लोकार्पण सोहळा केला त्याबाबत काटे यांनी त्यांचे आभार मानले. काटे म्हणाले कि हि मुलं एवढी हुशार आहेत कि आपण लहानपाणी शिकलो कि A for Apple , B for Ball , पण ही मुलं A for Attitude, B for believed, C for Confidence आणि D for discipline असे मानणारी हि मुलं आहेत. हे स्मार्ट युग आहे. तुषार हिंगे आणि सोनाली हिंगे यांनी मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला आहे. आपल्या प्रभागापुरता विचार न करता तुषार हिंगे यांनी संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरातील विद्यार्थ्यांचा आज येथे गौरव केला आहे. यावेळी विद्याथ्यांना सल्ला देताना काटे म्हणाले कि, आपल्या मनाशी खूणगाठ बांधा. आपण करिअरचा वेगळा मार्ग निवडा. असं करिअर करा कि हा देश तुमच्याकडे पाहिल. चांगले विचार मनात घ्या, असे म्हणत काटे यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सदाशिव खाडे यावेळी म्हणाले, तुषार भाऊंनी आरंभाच्या माध्यमातून हा गुणगौरव सोहळा जो आयोजित केला आहे, त्याला गुणांची अट ठेवली नाही. प्रत्येकाच्या गुणांचा गौरव करणं आणि प्रत्येकाच्या गुणाची सामाजिकरित्या वाहवा करणं अशा स्वरूपाचा हा कार्यक्रम आहे. तुषार हिंगे आपल्या सर्वांच्या पाठीशी आहेत. या सोहळ्यामुळे आपल्या पाठीवर शाब्बासकीची थाप मिळते, आणि शाब्बासकीची थाप मिळाल्यामुळे तेवढ्याच स्फूर्तीने पुढे आपण लढत राहतो.

तुषार हिंगे आणि सोनाली हिंगे यांनी आठ वर्षांपासून घेतलेला हा वसा पुढेही सुरु राहील अशी ग्वाही यावेळी खाडे यांनी दिली आयोजक तुषार हिंगे यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना प्रथम उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले कि, येणारी पिढी हि बाहेरगावी न जाता आपल्या शहरात, देशातच राहिली पाहिजे, त्यासाठी काय करत येईल यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत. सर्व विद्यार्थ्यांना सांगू इच्छितो कि भाजप पिंपरी चिंचवड शहर असेल किंवा आरंभ सोशल फाउंडेशन असेल हे कायम तुमच्या सोबत असेल. आपल्या सुख दुःखात तसेच शैक्षणिक प्रगतीत कोणत्याही गोष्टीची आवश्यकता भासली तर आम्ही तुमच्या सोबत असल्याची ग्वाही यावेळी यावेळी तुषार हिंगे यांनी दिली.

# गुंतवणुकीच्या आमिषाने ठेवीदारांची 10 कोटींची फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : गुंतवणुकीच्या आमिषाने निवृत्त लष्करी अधिकाऱ्यासह चार ते पाच जणांची १० कोटी ४६ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत मनीष केदारनाथ सुरवसे (वय ४८, रा. बी. टी. कवडे रस्ता) यांनी कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुरवसे हे निवृत्त लष्करी अधिकारी आहेत. एका नातेवाईकाच्या मदतीने त्यांची आरोपींशी सप्टेंबर २०२४ मध्ये ओळख झाली होती. आरोपींनी सुरवसे यांच्यासह मित्रांना गुंतवणुकीवर ३० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखविले. त्यांचा विश्वास संपादन करून 'लर्नोवेशन इंडिया' या ट्रेडिंग एज्युकेशन फर्ममध्ये तीन कोटी २५ लाख २८ हजार रुपयांची गुंतवणूक करण्यास भाग पाडले.सुरवसे यांच्यासह त्यांच्या मित्रांना जादा परताव्याचे आमिष दाखवून आरोपींनी त्यांना गुंतवणूक करण्यास भाग पाडले. आरोपींनी आतापर्यंत चार ते पाच जणांची १० कोटी ४६ लाख ६३ हजार रुपयांची फसवणूक केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील थोपटे तपास करत आहेत.


# शिवसेना उपनेते इरफानभाई सय्यद

## यंदाचा वाढदिवस साजरा करणार नाही..

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : शिवसेना शिरूर लोकसभा संपर्कप्रमुख तथा उपनेते इरफानभाई सय्यद यांचा मंगळवारी (दि. १७) रोजी वाढदिवस आहे. तो साजरा होणार नसल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांचा मोठा हिरमोड झाला आहे.

दरम्यान इरफानभाई सय्यद यांच्या वडिलांचे ८ ऑक्टोबर २०२४ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या अकाली जाण्याने संपूर्ण सय्यद कुटुंब अजूनही दुखातून सावरले नाही. त्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.




इरफानभाई सय्यद यांचा वाढदिवस म्हणजे दरवर्षी विधायक आणि सामाजिक उपक्रमांची मेजवानी असते. दरवर्षी त्यांच्या वाढदिवशी पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या संख्येने रक्तदान शिबिरे, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, अनाथांना वस्तूंचे वाटप, रोजगार मेळावे भरत असत. त्या माध्यमातून दिन दुबळ्यांची सेवा घडताना दिसत असे. कार्यकर्त्यांमध्येही मोठा उत्साह ओसंडून वाहायचा. शिवसेनेचे मोठे राजकीय शक्तिप्रदर्शन त्या माध्यमातून साधले जायचे. यंदा इरफानभाई यांचा वाढदिवस उद्यावर आलेला असताना देखील सर्वत्र शांतता पसरली आहे.

दरम्यान इरफानभाई यांची वाढदिवस साजरा न करण्याबाबत सोशल मिडीयावर एक पोस्ट मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. त्यातील मजुकर वाचून अनेकजण भारावून जाताना दिसत आहे.

**... यंदाचा वाढदिवस एक भावनांची उर्मी ...**

"माझा वाढदिवस दरवर्षी १७ जून रोजी आपल्या सर्वांच्या प्रेमाने आणि उत्साहात साजरा होत असतो.

आपण सर्वांनी गेल्या कित्येक वर्षांपासून मला भरभरून प्रेम, साथ आणि आशीर्वाद दिले आहेत.

परंतु यंदा... माझ्या वडिलांचे दुःखद निधन झाले असल्याने अंतर्मन ढवळून निघतंय.

त्यामुळे, यंदाचा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय मी व माझे सहका-यांनी घेतला आहे.

माझ्यावर मनापासून प्रेम करणारे कार्यकर्ते, कामगार वर्ग, मित्र परिवार आणि शुभचिंतकांनी माझी ही भावना समजून घ्यावी, ही नम्र विनंती आहे.

या काळात तुम्ही फक्त तुमची मौन साथ, समजूत आणि संयम हीच माझ्यासाठी खरी शक्ती ठरेल.

तुमच्या प्रेमासाठी आणि सदैव मिळणा-या आधारासाठी मनःपूर्वक आभार"...

इरफानभाई, संपर्कप्रमुख शिरूर लोकसभा शिवसेना उपनेते / सदस्य : महाराष्ट्र राज्य माथाडी कामगारट सल्लागार समिती महा. शासन...

# संस्कार प्रतिष्ठानवतीने व मौजे कोयाळी तर्फे चाकण येथे वृक्ष लागवड

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मा .वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष कंक आणि संस्कार प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मोहन गायकवाड यांच्या मार्गर्शनाखाली संस्कार प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य पिंपरी चिंचवड शहर आणि वनविभाग चाकण व कोयाळी ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमानाने ४०० पिंपळ, लिंब,वावळा,कांचन,गुलभेंडी, शमी, शिरस इत्यादी वृक्षाची लागवड करण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी कोयाळी गावचे आदर्श सरपंच विकास सेठ भिवरे व डॉ. मोहन गायकवाड यांनी वृक्ष पूजा करून झाडे लावण्यात सुरुवात केली. वनपरिंडळ अधिकारी आळंदी आनंदकुमार इंदलकर व वनरक्षक कोयाळी नवनाथ पगडे यांनी झाडे लावण्या संदर्भात मार्गदर्शन केले .वनसेवक दौलत वाडेकर ग्रामस्थ धनराज तोंडे, अजय कोळेकर सुरेश खंडवे तसेच संस्कार प्रतिष्ठानचे सभासद सुनिता गायकवाड रोहित मोरे श्वेता मोरे संध्या स्वामी सायली सुर्वे राजेंद्र फडतरे प्रभाकर मेरूकर शिवानी जगदाळे प्रिया पुजारी पांडुरंग सुतार अनिल जगदाळे दिपाली मोरे खुशी ओवाळ रंजना जोशी विकास पाटील आनंद पाथरे मोहिनी सूर्यवंशी अरुण कळंबे वैशाली खुडे सुधाकर खुडे यांनी सहभाग घेतला.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्ग पूर्ण होण्यासाठी आणखी विलंब!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्ग पूर्ण होण्यासाठी आणखी विलंब होणार असून, या प्रकल्पाला मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) दिला आहे. 'पीएमआरडीए'कडून हाती घेण्यात आलेल्या २३.३ किलोमीटर अंतराच्या माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो



प्रकल्पाचे ८५ टक्क्यांपेक्षा जास्त काम पूर्ण झाले आहे. या मार्गावरील पूल बांधण्यात आले असून, लोहमार्ग (रुळ) देखील टाकण्यात आले आहेत.

सद्य:स्थितीला २३ स्थानकांवरील सरकते जिने, वाहतूक नियंत्रण दिवे (सिग्नल), विद्युत यंत्रणा आणि इतर किरकोळ दुरुस्तीची कामे अंतिम टप्प्यात असली, तरी या प्रकल्पातील 'राजभवन'ची जागा सुरक्षेच्या कारणास्तव हस्तांतरित करण्यास नकार देण्यात आला होता अखेर फेब्रुवारी महिन्यात ही जागा देण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली. मात्र, ही जागा केवळ नावालाच हस्तांतरित करण्यात आली.

या ठिकाणी काम करण्यास सुरक्षेच्या कारणास्तव नकार मिळत असून, परवानग्यांसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

या ठिकाणी स्थानकाचे काम पूर्ण करून मेट्रोची चाचणी याच वर्षी घेण्याचा प्रयत्न असल्याचे 'पीएमआरडीए'कडून सांगण्यात आले.

# आदर्श शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

आदर्श शिक्षण संस्थेच्या प्रांगणात नवीन शैक्षणिक वर्ष सुरु झाल्याच्या निमित्ताने प्रवेशाचा जल्लोत्सव साजरा करण्यात आला.

बालवाडी ,प्राथमिक,माध्यमिक विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने आज एवढ्या पावसाळी वातावरणात उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बारसे यांच्या उपस्थितीत शाळेच्या



मुख्याध्यापिका प्रियांका बारसे, उपमुख्याध्यापिका चित्रा औटी बालवाडी विभागाच्या मुख्याध्यापिका सुषमा कुंभार, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वंदना लढे यांनी मुलांचे औक्षण करून त्यांचे स्वागत केले.

यावेळी मुलांना शासनाची मोफत पाठ्यपुस्तके वाटण्यात आली. टाळ्या वाजवून मुलांवर फुले उधळून ,फुगे -खाऊ वाटून जल्लोषात मुलांचे स्वागत झाले.यावेळी विद्यार्थ्यांना शाळेत आल्याचा व आपल्या मित्र-मैत्रिणी भेटल्याचा आनंद चेहऱ्यावरून ओसंडून वहात होता.

भदाडे सरांनी रांगोळी - फलकलेखनातुन तर मोडक मॅडम यांनी सेल्फी पाईंट बनवुन तर शिक्षकांनी शाळा तोरणांनी फुग्यांच्या माळांनी सजवली .गायकवाडसरांनी शब्दसुमनांची उधळण करुन शिक्षक विद्यार्थी व पालकांना नविन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

# दौंड पुणे डेमूच्या डब्यात आग!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

दौंडहून पुण्याकडे जाणाऱ्या डिझेल इलेक्ट्रिक मल्टिपल युनिट (डेमू) गाडीच्या एका डब्यात सोमवारी सकाळी येवत रेल्वे स्थानकाजवळ आग लागल्याचा प्रकार घडला. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. डब्यातून धूर बाहेर पडत असल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.पुणे रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, दौंडहून येणारी ही गाडी सकाळी ७.५२ वाजता यवत स्थानकावर थांबली होती. त्याच दरम्यान, एक मध्यमवयीन व्यक्ती डब्यात आला आणि त्याने बिडी पेटवून स्वच्छतागृहाच्या जवळ असलेल्या कचरापेटीत टाकली. त्यानंतर डब्यातून धूर येऊ लागला. गाडी स्थानकावरच असल्याने रेल्वेचे कर्मचारी व रेल्वे सुरक्षा दलाने (आरपीएफ) आगीवर तत्काळ नियंत्रण मिळवले.



